

# श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक


पब्लिक ट्रस्ट नंबर ए-४०५

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक ४२२२१२ फोन : ०२५९४-२३३२१५

Website : www.trimbakeshwartrust.com. Email : trimbakeshwartrust@gmail.com


जावक क्रमांक : ७०/२०२० दिनांक : ३१/१०/२०२०

## जाहीर अल्प मुदत निविदा

तमाम पुरवठादारांना कळविण्यात येते की, दि. २९/११/२०२० रोजी त्रिपुरारी पौर्णिमा (कार्तिक पौर्णिमा) निमित्त त्र्यंबकेश्वर मंदिराच्या कोटाचे उत्तर महाद्वार, त्र्यंबकेश्वर मंदिराचे सभामंडपाचे तीनही द्वार, गर्भगृहाचे द्वार, नंदी मंदिर, कोठी हॉल (ऑफिस), तीर्थराज कुशावर्त व श्री त्र्यंबकराजांच्या रथास फुलांची सजावट करावयाची आहे.

**फुलांच्या सजावटीसाठी खालील तपशीलवार प्रमाणे दर मागविण्यात येत आहेत.**

१) त्र्यंबकेश्वर मंदिराच्या कोटाचे उत्तर महाद्वार येथे ३६ फूट X ५ फुटांचे तोरण

२) मंदिराच्या आतील तीनही द्वार २० फूट X ३ फुटांचे तीन तोरण

३) मंदिर कोटाच्या तीनही द्वारास १० फूट X २ फुटांचे तीन तोरण

४) नंदी मंदिरास झेंडूच्या फुलाच्या माळीचे आतील व बाहेरील बाजूस आकर्षक सजावट

५) मंदिराच्या सभामंडपाचे तीन द्वार, एक गर्भगृहाचे द्वार, सभामंडपातील ८ छोटे मंदिरे यास फ्लॉवर बेल्ट प्रकारात सजावट (वेल प्रकारची सजावट)

६) देवस्थान कोठी कार्यालयाचे उत्तरद्वार येथे ५० फूट X २ फुटांचे तोरण

७) देवस्थान कोठी कार्यालयाचे पूर्वद्वार येथे २० फूट X २ फुटांचे तोरण

८) देवस्थान कोठी कार्यालयास व तीर्थराज कुशावर्त येथे पेशवाई प्रकारची सजावट, यासाठी खांबांना पेशवाई पडदे, झालर, खांबावर फ्लॉवर बुके, रेशमी घंटी इ. प्रकारची सजावट.

९) त्र्यंबकराजाच्या रथास फुलांची सजावट करणे, त्यामध्ये कळसावर फुलांच्या माळीची सजावट, वरील पट्टीसाठी चारही बाजूस फ्लॉवर बेल्ट प्रकारची सजावट. आतील सहा खांब, बाहेरील चार खांब यास राउंड फ्लॉवर प्रकारची सजावट.

**टीप :** * तोरण सजावटीसाठी झेंडू, शेवंती, अष्टर, अशोका, कलर बॉल इ. प्रकार वापरून विविध प्रकारचे डिझाईन करणे.

* रथास व इतर नमूद ठिकाणी फ्लॉवर बेल्ट प्रकारची सजावट करताना जरबेरा, आर्किड, कार्नेशन, ग्लॅडियेला, जीप्सम, अँथोरीअम, पॉलीरोझ पिंक रेड, शेवंती, सनॉपपइंडिया, ड्रेसीना, स्प्रींगेरी, बॉटलपाम, कामिणी व इत्यादी वापरून सजावट करणे.

तरी इच्छुक पुरवठादारांनी निविदा प्रसिद्ध झालेपासून ४ दिवसांच्या आत देवस्थान कार्यालयामध्ये आपले दरपत्रक बंद लिफाफ्यात सादर करावीत. वेळेत सादर होणाऱ्या निविदांचाच विचार केला जाईल. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार देवस्थान ट्रस्ट राखून ठेवत आहे.

सही/-

शिक्का

**प्रशासकीय अधिकारी**

श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक